**बृहन्मुंबई महानगरपालिका**

उअउ/परि-४/ 64 / पी /एसआर/ओडी
3/11/2025

**विषय: के/पश्चिम** विभागातील अंधेरी (प) येथील अंधेरी गावाचा न. भू. क्र. 217, 217/1 ते 18, अंधेरी रिक्रिएशनल क्लब च्या मागे , अंधेरी (प) , मुंबई येथील नियोजित इमारतीच्या बांधकामात /पुनर्विकासकामात येणारी झाडे काढण्याच्या प्रस्तावाबाबत. (अंधेरी पुरब पश्चिम को. ऑप. हाउ. सोसायटी लिमिटेड करीता ) **(53/2025- 26 )**

**संदर्भ:**क्र.MGC/A/5207 दि.17/05/2024

उपरोक्त विषयास अनुसरून महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ च्या कलम ८(६) मधील तरतुदीं नुसार **मे. डेम कंस्ट्रक्शन एल लेल पी** हयांजकडून **के/पश्चिम** विभागातील अंधेरी (प) येथील अंधेरी गावाचा न. भू. क्र. 217, 217/1 ते 18, अंधेरी रिक्रिएशनल क्लब च्या मागे , अंधेरी (प) , मुंबई येथील नियोजित इमारतीच्या बांधकामात /पुनर्विकासकामात येणारी एकूण **23 तेविस) झाडे काढण्यास** परवानगी मिळणेबाबतच्या विनंतीचा प्रस्ताव दिनांक **06/08/2025** रोजी प्राप्त झाला आहे. त्यास अनुसरून कनिष्ठ वृक्ष अधिकारी / उद्यान विद्या सहाय्यक, के/प व सहाय्यक उद्यान अधिक्षक, के/प यांनी **दि.12/09/2025 रोजी** केलेल्या पाहणीनूसार सदरहू जागेवर एकूण **52(बावण्ण) झाडे** अस्तित्वात आहेत. तथापि अर्जदाराने सादर केलल्या संमत आराखडयानुसार व स्थळपाहणीनूसार सदरहू ठिकाणावरील **23(तेविस) झाडे** नियोजित इमारतीच्या बांधकामात व खोदकामात येत असल्याने सदरची झाडे काढणेसाठी प्रस्तावित आहेत.

तदनुषंगाने **के/पश्चिम** विभागातील अंधेरी (प) येथील अंधेरी गावाचा न. भू. क्र. 217, 217/1 ते 18, अंधेरी रिक्रिएशनल क्लब च्या मागे , अंधेरी (पं) , मुंबई येथील नियोजित इमारतीच्या बांधकामात /पुनर्विकासकामात येणारी **10(दहा)** झाडे ( झाडांचा अनु. क्र.**1, 4, 6, 7, 30, 37, 39, 47, 50, 51) कापणे** व **13(तेरा)** झाडे (झाडांचा अनु. क्र. **2, 3, 5, 12, 13, 35, 36, 42, 44, 45, 46, 48, 49) पुनर्रोपित करणे** व **वृक्ष क्र.34 चा 15 फुटावरील भाग कापणे व सदर वृक्ष क्र. 34 सह उर्वरीत 29(एकोणतीस) झाडे** (झाडाचा अनु. क्र. **8 ते 11 , 14 ते 29, 31 ते 34, 37A, 38, 40, 41, 43 ) आहे तसेच ठेवणे** बाबतच्या प्रस्तावाची पडताळणी करण्यात आलेली असून, **यथायोग्य** असल्याने मंजूरी करीता शिफ़ारस करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रस्तावातील सदरची एकूण **23(तेविस) झाडे** वृक्ष नियोजित इमारतीच्या बांधकामात व खोदकामात बाधित होत असल्याची खात्री करण्यात आली असून सदर वृक्ष वाचविणे शक्य नसल्याची खातरजमा करण्यात आली आहे.

यास्तव, सदरचा प्रस्ताव आपल्या मंजूरीकरीता व स्वाक्षरीकरीता सविनय सादर.

एसजी/ 3517 /टीए
06/11/25

**उप उद्यान अधिक्षक (परि-4)**

**उद्यान अधिक्षक व वृक्ष अधिकारी**
महोदय,

**उद्यान अधीक्षक**

**मा. उपायुक्त (उद्याने)**
महोदय,

उप आयुक्त (उद्याने)

**मा. महानगरपालिका आयुक्त / अध्यक्ष, वृक्ष प्राधिकरण**
महोदय,

11/12

महानगरपालिका आयुक्त

बृहन्मुंबई महानगरपालिका
उद्यान अधीक्षक यांचे कार्यालय
व वृक्ष प्राधिकरण

04 NOV 2025

क्रमांकSG/...TA13517.....

उप आयुक्त (उद्याने) यांचे कार्यालय
क्रमांक: उप आयुक्त/उद्याने/ 2159
आवक दिनांक : 06.11.2025 (file)
जावक दिनांक : 10.11.2025

बृहन्मुंबई महानगरपालिका
आयुक्तांचे कार्यालय

11 NOV 2025

समय ११, १२, १३, १४, १५, १६, १७, १८
क्रमांक MDG/8540

विशेष उद्यान अधिक्षक व वृक्ष अधिकारी

बृहन्मुंबई महानगरपालिका
उद्यान अधीक्षक यांचे कार्यालय
व वृक्ष प्राधिकरण

15 DEC 2025

क्रमांकSG/.MC/1831.........

18/12/25

उ.अ.उ. (Z-I/II, III, IV, V, VI, VII, TA)
प्रशा. अ. VJBU
योग्य त्या कार्यवाही करिता

उद्यान अधिक्षक

बृहन्मुंबई महानगरपालिका
उप उद्यान अधिक्षक (परि-४)

19 DEC 2025

क्र.....3681SGMC.....
19/12/25

★ सहा. उद्यान.अधि.(के/प)/(पी/द)/(पी/उ)/(पी/प)मुख्य लिपिक,लिपीक RC/EC
★ ........................................
1) आवश्यक कार्यवाही करावी. JTO(W)
2) कृपया पाहणी करून अहवाल सादर करावा.
3) कृपया नोंद घ्यावी व दप्तरी ठेवावे.
4) कृपया चर्चा करावी.
५) ०५ दिवसात उत्तर सादर करावे.
६).........................................

उप उद्यान अधिक्षक (परि-४)

**बृहन्मुंबई महानगरपालिका** एसजी/ 3517 /टीए

क्रमांक: दिनांक: 06/11/25

**विषय:** **के/पश्चिम** विभागातील अंधेरी (प) येथील अंधेरी गावाचा न. भू. क्र. 217, 217/1 ते 18, अंधेरी रिक्रिएशनल क्लब च्या मागे , अंधेरी (प) , मुंबई येथील नियोजित इमारतीच्या बांधकामात /पुनर्विकासकामात येणारी झाडे काढण्याच्या प्रस्तावाबाबत. (अंधेरी पुरब पश्चिम को. ऑप. हाउ. सोसायटी लिमिटेड करीता ) (**53/2025- 26** )

"महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ च्या कलम ८(६) मधील तरतुदीं नुसार काढण्यात येणा-या झाडांची संख्या २५(पंचवीस) अथवा त्यापेक्षा कमी असल्यास वृक्ष प्राधिकरणाचे अधिकार व कर्तव्य मनपा आयुक्त यांना प्रदान करण्यात आले आहेत. तदनुषंगाने मनपा आयुक्त व अध्यक्ष वृक्ष प्राधिकरण यांच्या विचारार्थ प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. सदर परवानगी देण्यात आलेल्या प्रस्तावाची नोंद / अभिलेख उद्यान अधीक्षक / वृक्ष प्राधिकरण अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत ठेवण्यात येईल.

२. मा. उच्च न्यायालयाने याचिका क्रमांक ४६ मधील दिनांक 21/02/2018 रोजीच्या आदेशान्वये मा. मनपा आयुक्त यांना त्यांचे कायदा महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ च्या कलम ८ मधील पोटकलम ६ अन्वये प्रदान करण्यात आलेले अधिकार वापरण्यास मज्जाव करण्यात आला होता. सदरहू, बाबतीत मा. उच्च न्यायालयाने सुधारीत आदेश दि. 23.04.2018 रोजी पारित केले असुन, त्यात काही अटींसह सुधारणा झाल्या असुन, मा. मनपा आयुक्त यांना आपले अधिकार वापरण्यास परवानगी दिलेली आहे.त्यानुसार सदर प्रस्ताव पुढील प्रमाणे आहे.

३. **के/पश्चिम** विभागातील अंधेरी (प) येथील अंधेरी गावाचा न. भू. क्र. 217, 217/1 ते 18, अंधेरी रिक्रिएशनल क्लब च्या मागे , अंधेरी (प) , मुंबई येथील नियोजित इमारतीच्या बांधकामात /पुनर्विकासकामात येणारी येणारी एकूण **23(तेविस) झाडे** काढण्यास परवानगी मिळणेबाबतच्या विनंतीचा प्रस्ताव **मे. डेम कंस्ट्रक्शन एल लेल पी** हयांजकडून **दिनांक 06/08/2025** रोजी प्राप्त झाला आहे. त्याअनुषंगाने अर्जदाराने अटी व शर्तींची पुर्तता **दिनांक 03/11/2025** रोजी केलेली आहे.

४. सदरहू प्रश्नांतर्गत जागेची पाहणी **दि.12/09/2025** रोजी हया खात्यातील अधिका-यांनी

1. **उद्यान विद्या सहाय्यक (के/पश्चिम) – श्री. संदेश धापते**
2. **सहाय्यक उद्यान अधिक्षक (के/पश्चिम)– श्री. हनुमंत गोसावी**
1. **उप- उद्यान अधिक्षक (परि-4) - श्री. सचिन अत्तरदे**

केली असता असे आढळून आले की, सद्यस्थितीत सदरहू जागेवर एकूण **52(बावण्ण)** झाडे अस्तित्वात आहेत. त्यापैकी **23(तेविस) झाडे** नियोजित इमारतीच्या खोदकामात व बांधकामात येत असल्याने काढणे आवश्यक आहे. यास्तव, सदर **52(बावण्ण)** झाडांपैकी नियोजित ईमारतीच्या बांधकामात / पुनर्विकासकामात येणारी **10(दहा)** झाडे ( झाडांचा अनु. क्र.**1, 4, 6, 7, 30, 37, 39, 47, 50, 51**) **कापणे** व **13(तेरा)** झाडे (झाडांचा अनु. क्र. **2, 3, 5, 12, 13, 35, 36, 42, 44, 45, 46, 48, 49**) **पुनर्रोपित करणे** व वृक्ष **क्र.34 चा 15 फुटावरील भाग कापणे व सदर वृक्ष क्र. 34 सह उर्वरीत 29(एकोणतीस) झाडे** (झाडाचा अनु. क्र. **8 ते 11 , 14 ते 29, 31 ते 34, 37A, 38, 40, 41, 43** ) **आहे तसेच ठेवणे** याकरीता प्रस्ताविण्यात येत आहेत. पाहणीचा सविस्तर अहवाल यासोबत सादर कण्यात आलेला आहे (पृष्ठ क्र. प - 107 -109 ).

वृक्ष अधिकारी यांचा अहवाल खालीलप्रमाणे आहे.

| अनु. क्र. | झाडांचा अनु. क्र. | जात | वनस्पती-शास्त्रीय नाव | अंदाजे घेर (ft) | अंदाजे उंची (ft) | झाडाचे वय (वर्ष) | कापणे / पुनर्रोपित करणे / आहे तसेच ठेवणे | कारण /अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ३ | ४ | ५ | ६ | | ७ |
| 1 | 1 | अशोक | पॉलिएलथिया लॉंगिफोलिया | 3 | 35 | 20 | कापणे | सदर झाड नियोजित इमारतीच्या बांधकामात येत आहे. (प्लिंथ) |
| 2 | 2 | अशोक | पॉलिएलथिया लॉंगिफोलिया | 2 | 30 | 15 | पुनर्रोपित करणे | सदर झाड नियोजित इमारतीच्या बांधकामात येत आहे. (प्लिंथ) |
| 3 | 3 | ख्रिसमस ट्री | अरेकारीया कॉलमनारीस | 2 | 25 | 12 | पुनर्रोपित करणे | सदर झाड नियोजित इमारतीच्या बांधकामात येत आहे. (प्लिंथ) |
| 4 | 4 | फिशटेल पाम | कॅरीओटा युरेंस | 4.5 | 45 | 30 | कापणे | सदर झाड नियोजित इमारतीच्या बांधकामात येत आहे. (प्लिंथ) |
| 5 | 5 | अशोक | पॉलिएलथिया लॉंगिफोलिया | 1.5 | 35 | 10 | पुनर्रोपित करणे | सदर झाड नियोजित इमारतीच्या बांधकामात येत आहे. (प्लिंथ) |
| 6 | 6 | अशोक | पॉलिएलथिया लॉंगिफोलिया | 4 | 45 | 28 | कापणे | सदर झाड नियोजित इमारतीच्या बांधकामात येत आहे. (प्लिंथ) |
| 7 | 7 | अशोक | पॉलिएलथिया लॉंगिफोलिया | 4 | 45 | 28 | कापणे | सदर झाड नियोजित इमारतीच्या खोदकामात येत आहे. |
| 8 | 8 | जांभूळ | सायजिजिअम क्यूमिणी | 2.5 | 30 | 20 | आहे तसेच ठेवणे | सदर झाड काढण्यास प्रस्तावित नाही |
| 9 | 9 | अशोक | पॉलिएलथिया | 3.5 | 40 | 25 | आहे तसेच ठेवणे | सदर झाड काढण्यास |

| अनु. क्र. | झाडांचा अनु. क्र. | जात | वनस्पती-शास्त्रीय नाव | अंदाजे घेर (ft) | अंदाजे उंची (ft) | झाडाचे वय (वर्ष) | कापणे / पुनर्रोपित करणे / आहे तसेच ठेवणे | कारण /अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | लॉगिफोलिया | | | | | प्रस्तावित नाही |
| 10 | 10 | अशोक | पॉलिएलथिया लॉगिफोलिया | 3 | 35 | 20 | आहे तसेच ठेवणे | सदर झाड काढण्यास प्रस्तावित नाही |
| 11 | 11 | अशोक | पॉलिएलथिया लॉगिफोलिया | 3 | 30 | 20 | आहे तसेच ठेवणे | सदर झाड काढण्यास प्रस्तावित नाही |
| 12 | 12 | जांभूळ | सायजिजिअम क्यूमिणी | 2.5 | 25 | 20 | पुनर्रोपित करणे | सदर झाड नियोजित इमारतीच्या खोदकामात येत आहे. |
| 13 | 13 | अशोक | पॉलिएलथिया लॉगिफोलिया | 1.5 | 35 | 10 | पुनर्रोपित करणे | सदर झाड नियोजित इमारतीच्या खोदकामात येत आहे. |
| 14 | 14 | अशोक | पॉलिएलथिया लॉगिफोलिया | 3 | 35 | 20 | आहे तसेच ठेवणे | सदर झाड काढण्यास प्रस्तावित नाही |
| 15 | 15 | अशोक | पॉलिएलथिया लॉगिफोलिया | 2.5 | 15 | 15 | आहे तसेच ठेवणे | सदर झाड काढण्यास प्रस्तावित नाही |
| 16 | 16 | अशोक | पॉलिएलथिया लॉगिफोलिया | 3 | 35 | 20 | आहे तसेच ठेवणे | सदर झाड काढण्यास प्रस्तावित नाही |
| 17 | 17 | अशोक | पॉलिएलथिया लॉगिफोलिया | 3 | 35 | 20 | आहे तसेच ठेवणे | सदर झाड काढण्यास प्रस्तावित नाही |
| 18 | 18 | अशोक | पॉलिएलथिया लॉगिफोलिया | 3 | 35 | 20 | आहे तसेच ठेवणे | सदर झाड काढण्यास प्रस्तावित नाही |
| 19 | 19 | अशोक | पॉलिएलथिया लॉगिफोलिया | 2.5 | 25 | 15 | आहे तसेच ठेवणे | सदर झाड काढण्यास प्रस्तावित नाही |

| अनु. क्र. | झाडांचा अनु. क्र. | जात | वनस्पती-शास्त्रीय नाव | अंदाजे घेर (ft) | अंदाजे उंची (ft) | झाडाचे वय (वर्ष) | कापणे / पुनर्रोपित करणे / आहे तसेच ठेवणे | कारण /अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 20 | 20 | अशोक | पॉलिएलथिया लॉंगिफोलिया | 2.5 | 35 | 15 | आहे तसेच ठेवणे | सदर झाड काढण्यास प्रस्तावित नाही |
| 21 | 21 | गुलमोहर | डेलोनिक्स रेजिया | 4 | 35 | 25 | आहे तसेच ठेवणे | सदर झाड काढण्यास प्रस्तावित नाही |
| 22 | 22 | अशोक | पॉलिएलथिया लॉंगिफोलिया | 2 | 35 | 15 | आहे तसेच ठेवणे | सदर झाड काढण्यास प्रस्तावित नाही |
| 23 | 23 | अशोक | पॉलिएलथिया लॉंगिफोलिया | 2.5 | 35 | 18 | आहे तसेच ठेवणे | सदर झाड काढण्यास प्रस्तावित नाही |
| 24 | 24 | अशोक | पॉलिएलथिया लॉंगिफोलिया | 2.5 | 35 | 18 | आहे तसेच ठेवणे | सदर झाड काढण्यास प्रस्तावित नाही |
| 25 | 25 | अशोक | पॉलिएलथिया लॉंगिफोलिया | 2 | 35 | 12 | आहे तसेच ठेवणे | सदर झाड काढण्यास प्रस्तावित नाही |
| 26 | 26 | गुलमोहर | डेलोनिक्स रेजिया | 4 | 40 | 25 | आहे तसेच ठेवणे | सदर झाड काढण्यास प्रस्तावित नाही |
| 27 | 27 | अशोक | पॉलिएलथिया लॉंगिफोलिया | 2 | 30 | 15 | आहे तसेच ठेवणे | सदर झाड काढण्यास प्रस्तावित नाही |
| 28 | 28 | गुलमोहर | डेलोनिक्स रेजिया | 3.5 | 40 | 20 | आहे तसेच ठेवणे | सदर झाड काढण्यास प्रस्तावित नाही |
| 29 | 29 | गुलमोहर | डेलोनिक्स रेजिया | 3.5 | 40 | 20 | आहे तसेच ठेवणे | सदर झाड काढण्यास प्रस्तावित नाही |
| 30 | 30 | गुलमोहर | डेलोनिक्स रेजिया | 4 | 40 | 25 | कापणे | सदर झाड नियोजित इमारतीच्या खोदकामात येत आहे. |

| अनु. क्र. | झाडांचा अनु. क्र. | जात | वनस्पती-शास्त्रीय नाव | अंदाजे घेर (ft) | अंदाजे उंची (ft) | झाडाचे वय (वर्ष) | कापणे / पुनर्रोपित करणे / आहे तसेच ठेवणे | कारण /अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 31 | 31 | अशोक | पॉलिएलथिया लॉंगिफोलिया | 1.5 | 20 | 10 | आहे तसेच ठेवणे | सदर झाड काढण्यास प्रस्तावित नाही |
| 32 | 32 | अशोक | पॉलिएलथिया लॉंगिफोलिया | 2 | 30 | 15 | आहे तसेच ठेवणे | सदर झाड काढण्यास प्रस्तावित नाही |
| 33 | 33 | अशोक | पॉलिएलथिया लॉंगिफोलिया | 3.5 | 40 | 25 | आहे तसेच ठेवणे | सदर झाड काढण्यास प्रस्तावित नाही |
| 34 | 34 | गुलमोहर (झुकेलेले) | डेलोनिक्स रेजिया | 4 | 40 | 25 | आहे तसेच ठेवणे | सदर झाड नियोजित इमारतीच्या बाजूने झुकलेले असून बांधकामात अडथळा करीत असल्याने **15 फुटावरील भाग कापणे** व झाड आहे तसेच ठेवणे |
| 35 | 35 | बदाम | टर्मिनालिया कटप्पा | 2.5 | 30 | 20 | पुनर्रोपित करणे | सदर झाड नियोजित इमारतीच्या बांधकामात येत आहे. (प्लिंथ) |
| 36 | 36 | गुलमोहर | डेलोनिक्स रेजिया | 3 | 35 | 20 | पुनर्रोपित करणे | सदर झाड नियोजित इमारतीच्या बांधकामात येत आहे. (प्लिंथ) |
| 37 | 37 | नारळ (मृत) | कोकोस न्युसिफेरा | 4 | 30 | 25 | कापणे | सदर झाड नियोजित इमारतीच्या बांधकामात येत आहे. (प्लिंथ) |
| 38 | 37A | आवळा | फायलॅंथस ॲसिडस | 6'' | 10 | 5 | आहे तसेच ठेवणे | सदर झाड काढण्यास प्रस्तावित नाही |
| 39 | 38 | बेल | ईगल मॉर्मेलॉस | 8'' | 12 | 5 | आहे तसेच ठेवणे | सदर झाड काढण्यास प्रस्तावित नाही |

| अनु. क्र. | झाडांचा अनु. क्र. | जात | वनस्पती-शास्त्रीय नाव | अंदाजे घेर (ft) | अंदाजे उंची (ft) | झाडाचे वय (वर्ष) | कापणे / पुनर्रोपित करणे / आहे तसेच ठेवणे | कारण / अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 40 | 39 | गुलमोहर | डेलोनिक्स रेजिया | 4 | 40 | 25 | कापणे | सदर झाड नियोजित इमारतीच्या बांधकामात येत आहे. (प्लिंथ) |
| 41 | 40 | उंबर | फायकस ग्लोमेरॅटा | 3.5 | 40 | 30 | आहे तसेच ठेवणे | सदर झाड काढण्यास प्रस्तावित नाही |
| 42 | 41 | चिंच | टमॅरींडस ईंडीका | 1 | 18 | 8 | आहे तसेच ठेवणे | सदर झाड काढण्यास प्रस्तावित नाही |
| 43 | 42 | नीम | अझेडीरेक्टा ईंडीका | 1.5 | 20 | 15 | पुनर्रोपित करणे | सदर झाड नियोजित इमारतीच्या बांधकामात येत आहे. (प्लिंथ) |
| 44 | 43 | गुलमोहर | डेलोनिक्स रेजिया | 3 | 35 | 20 | आहे तसेच ठेवणे | सदर झाड काढण्यास प्रस्तावित नाही |
| 45 | 44 | अशोक | पॉलिएलथिया लॉंगिफोलिया | 1 | 15 | 7 | पुनर्रोपित करणे | सदर झाड नियोजित इमारतीच्या बांधकामात येत आहे. (प्लिंथ) |
| 46 | 45 | अशोक | पॉलिएलथिया लॉंगिफोलिया | 1 | 18 | 8 | पुनर्रोपित करणे | सदर झाड नियोजित इमारतीच्या बांधकामात येत आहे. (प्लिंथ) |
| 47 | 46 | गुलमोहर | डेलोनिक्स रेजिया | 2.5 | 25 | 15 | पुनर्रोपित करणे | सदर झाड नियोजित इमारतीच्या बांधकामात येत आहे. (प्लिंथ) |
| 48 | 47 | पिंपळ | फायकस रिलिजिओसा | 9 | 40 | 45 | कापणे | सदर झाड नियोजित इमारतीच्या बांधकामात येत आहे. (प्लिंथ) |

| अनु. क्र. | झाडांचा अनु. क्र. | जात | वनस्पती-शास्त्रीय नाव | अंदाजे घेर (ft) | अंदाजे उंची (ft) | झाडाचे वय (वर्ष) | कापणे / पुनर्रोपित करणे / आहे तसेच ठेवणे | कारण /अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 49 | 48 | अशोक | पॉलिएलथिया लॉगिफोलिया | 2 | 20 | 15 | **पुनर्रोपित करणे** | सदर झाड नियोजित इमारतीच्या बांधकामात येत आहे. (प्लिंथ) |
| 50 | 49 | कदंबा | अंथोसेफॅलस कदंबा | 3 | 25 | 20 | **पुनर्रोपित करणे** | सदर झाड नियोजित इमारतीच्या बांधकामात येत आहे. (प्लिंथ) |
| 51 | 50 | पिंपळ | फायकस रिलिजिओसा | 9 | 40 | 45 | **कापणे** | सदर झाड नियोजित इमारतीच्या बांधकामात येत आहे. (प्लिंथ) |
| 52 | 51 | पिंपळ | फायकस रिलिजिओसा | 9 | 40 | 45 | **कापणे** | सदर झाड नियोजित इमारतीच्या बांधकामात येत आहे. (प्लिंथ) |

५. याप्रकरणी महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ च्या कलम ८(३) च्या तरतुदीनुसार स्थानिक वृत्तपत्रामध्ये दि. 25/09/202025 रोजी जाहिरात देण्यात आलेली आहे व काढणे आवश्यक असलेल्या सर्व झाडांच्या ठळक भागावर नोटीस/सूचना चिटकवण्यात आले असुन सदर नोटीस / सूचनेसहीत झाडांचे फोटो माहितीकरिता हयासोबत जोडण्यात आलेले आहेत(पृ.क्र.प-127-171).सदर जाहिरातीच्या अनुषंगाने त्याबाबतची सुनावणी उद्यान अधिक्षक यांच्या दालनात दि.06/10/2025 रोजी दु. 4.30 वाजता ठेवण्यात आली होती. परंतु सदर प्रस्तावाबाबत कोणतेही आक्षेप प्राप्त झालेले नाहीत.

६. महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ च्या कलम ८(६) मधील तरतुदीं नुसार काढण्यात येणा-या झाडांची संख्या **२५(पंचवीस)** अथवा त्यापेक्षा कमी असल्यास वृक्ष प्राधिकरणाचे अधिकार व कर्तव्य मनपा आयुक्त यांना प्रदान करण्यात आले आहेत व मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या दिनांक **२३.०४.२०१८** रोजीच्या आदेशात खालीलप्रमाणे अटी व शर्ती घालण्यात आले आहे.

६.१) म.न.पा. आयुक्त हे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील उपलब्ध असलेले तज्ञ यांचा सल्ला घेतील व आदेश पारित करताना ज्या तज्ञांकडुन सल्ला घेण्यात आला आहे त्यांचे नाव नमूद करतील.
६.२) मा. उच्च न्यायलयाच्या आदेशा नुसार मनपा आयुक्त यांनी सदर बाबतीत परवागी दिल्यास सदर बाबतची सुचना स्थानिक वृत्त पत्रात प्रदर्शीत करण्यात यावी व महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर

अपलोड करण्यात यावी. सदरहू सुचना वृत्त पत्र व महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर अपलोड झाल्याच्या २१ दिवसा पर्यंत सदरहू परवानगीची अंमलबजावणी करण्यात येणार नाही.

६.३) म.न.पा. आयुक्त हे एका विविक्षित भूभागावर एकदाच परवानगी देऊ शकतील.

मा. उच्च न्यायालयाने वरील प्रमाणे दिलेल्या आदेशांचे अनुपालन या प्रस्तावात करण्यात आले आहे व ते खालीलप्रमाणे आहे.

६.४). महानगरपालिकेच्या उदयान विभागातील खालील तज्ञ अधिका-यांनी स्थळ पाहणी केलेली आहे.

1. **उद्यान विद्या सहाय्यक (के/पश्चिम) – श्री. संदेश धापते**
2. **सहाय्यक उद्यान अधिक्षक (के/पश्चिम)– श्री. हनुमंत गोसावी**
3. **उप- उद्यान अधिक्षक (परि-4) - श्री. सचिन अत्तरदे**

६.५). मा. उच्च न्यायलयाच्या आदेशा नुसार मा. मनपा आयुक्त यांनी सदर बाबतीत परवागी दिल्यास सदर बाबतची सुचना स्थानिक वृत्त पत्रात प्रदर्शित करण्यात येईल व बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर अपलोड करण्यात येईल. सदरहू सुचना वृत्त पत्र व बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर अपलोड झाल्याच्या २१ दिवसा पर्यंत सदरहू परवानगीची अंमलबजावणी करण्यात येणार नाही.

६.६) सदरहू भूभागावर महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ च्या कलम ८(६) अंतर्गत मा. मनपा आयुक्त यांचेकडून यापूर्वी परवानगी देण्यात आलेली नाही.

७. वृक्ष कापण्याच्या बदल्यात नवीन लावण्यात येणारी झाडे वृक्ष प्राधिकरणाच्या मानांकानुसार त्याच भूभागावरील मोकळया जागेत 15 दिवसांत लावण्यात येणार आहेत व सदर नवीन लावण्यात येणा-या झाडांची उंची 12 फुटापेक्षा व घेर 6 इंचापेक्षा कमी नसेल, असे पक्षकाराने प्रतिज्ञापत्रासह कळविलेले आहे.

८. पक्षकाराने कामाच्या अंमलबजावणी बाबत सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रातील कालावधीबाबत तसेच नविन लावण्यात येणारी झाडे/ पुनर्रोपित करण्यात येणारी झाडे यांच्या ठिकाणाबाबत फेरफार करावयाचा असल्यास मा. उद्यान अधिक्षक व वृक्ष अधिकारी हे संपूर्ण प्रस्तावाची शहानिशा करुन आवश्यक असल्यास फेरफार करण्यास संमती देतील.

९. नियमांनुसार/आदेशानुसार आवश्यक ती अर्ज प्रक्रिया शुल्क व अनामत रक्कम स्विकारल्यानंतर तसेच निकषानुसार आवश्यक ती नवीन झाडे लावण्याच्या अटीसह परवानगी देण्यात येईल.

यास्तव, महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ च्या कलम ८(३) (क) मधील तरतुदीनुसार विषयांकीत ठिकाणावरील नियोजित इमारतीच्या बांधकामात/ पुनर्विकासकामात अडथळा निर्माण करणा-या वृक्षांबाबतचा संक्षिप्त तपशील खालीलप्रमाणे आहे.

| कारण | कापणे | पुनर्रोपित करणे | आहे तसेच ठेवणे | एकूण | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| नियोजित इमारतीच्या बांधकामात व खोदकामात बाधित वृक्ष | 10 | 13 | --- | 23 | कापणे/पुनर्रोपित करणे याकरीता प्रस्तावित |
| झुकलेले वृक्ष | ---- | ---- | ---- | 01 | सदर झाडाचा 15 फुटावरील भाग कापणे व सदर झाड आहे तसेच ठेवणे |
| अबाधित/आहे तसेच ठेवणे | ---- | ---- | 29 | 29 | काढणेसाठी प्रस्तावित नाही |
| एकूण | 10 वृक्ष | 13 वृक्ष | 29 वृक्ष | 52 वृक्ष | |

उपरोक्त तक्त्यात नमूद केल्यानूसार **के/पश्चिम** विभागातील अंधेरी (प) येथील अंधेरी गावाचा न. भू. क्र. 217, 217/1 ते 18, अंधेरी रिक्रिएशनल क्लब च्या मागे , अंधेरी (प) , मुंबई येथील नियोजित इमारतीच्या बांधकामात /पुनर्विकासकामात येणारी **10(दहा)** झाडे ( झाडांचा अनु. क्र.1, 4, 6, 7, 30, 37, 39, 47, 50, 51) **कापणे** व 13(तेरा) झाडे (झाडांचा अनु. क्र. 2, 3, 5, 12, 13, 35, 36, 42, 44, 45, 46, 48, 49) **पुनर्रोपित करणे** व **वृक्ष क्र.34 चा 15 फुटावरील भाग कापणे व सदर वृक्ष क्र. 34 सह उर्वरीत 29(एकोणतीस) झाडे** (झाडाचा अनु. क्र. 8 ते 11 , 14 ते 29, 31 ते 34, 37A, 38, 40, 41, 43 ) **आहे तसेच ठेवणे** याकरीता प्रस्ताविले आहे. उपरोक्त प्रस्तावाची पडताळणी उप- उद्यान अधिक्षक(परि-4) यांच्यामार्फत करण्यात आलेली आहे. सदर प्रस्ताव यथायोग्य असून मा. महानगरपालिका आयुक्त / अध्यक्ष, वृक्ष प्राधिकरण यांची मंजूरी मिळणेकरीता शिफारस करण्यात येत आहे.

सविनय सादर.

**उद्यान अधिक्षक व वृक्ष अधिकारी**

**मा. उपायुक्त(उद्याने)**
**महोदय,**

11/12
उप आयुक्त (उद्याने)

**मा. महानगरपालिका आयुक्त / अध्यक्ष, वृक्ष प्राधिकरण**
महोदय,

11/12

महानगरपालिका आयुक्त